Pune Police

# प्रेसनोट

संघटीत गुन्हेगारी विरोधी पथक, उत्तर प्रादेशीक विभाग, गुन्हे शाखा, पुणे शहर या पथकाकडून डुप्लीकेट सिमेंट बनविणारा आडडा उध्वस्त करुन किं. रु. १९,८१,९७९/- चा माल जप्त केला.

दि. ०३/१०/२०१७ रोजी पोलीस निरीक्षक श्री. ब्रम्हानंद नाईकवाडी यांना खबऱ्याकडुन सातव नगर, हांडेवाडी रोड, पुणे येथे चौधरी इंटरप्रायझेस या सिमेंट विक्रीच्या गोडाऊनमध्ये बिर्ला सिमेंट मिक्सींगचा प्रकार चालु आहे, अशा मिळालेल्या खबरी नुसार, बिर्ला सिमेंट कंपनीचे एल.बी हाऊस चौथा मजला, ढोले पाटील रोड,बंडगार्डन रोड, पुणे येथील कार्यालयात संपर्क करुन, टॉर्क डिटेक्टीव्ह, गोरेगाव, मुंबई (प.) या कंपनीचे प्रोप्रायटर श्री. प्रभाकर शंकरराव भोसले व अल्ट्राटेक कंपनी लिमीटेड पुणे येथील अधिकारी श्री. महेश यल्लपा कोले व श्री. प्रतिक अरुण साळुंके व पोलीस स्टाफसह छापा टाकला असता, सदर ठिकाणी चार इसम हलक्या दर्जाचे (औष्णीक विदयुत केंद्रातील दगडी कोळश्याच्या राखेचे- जास्त प्रमाण असलेल्या) पेन्ना कंपनीचे सिमेंट हे बिर्ला सुपर कंपनीचे उच्च दर्जाचे सिमेंट असल्याचे सर्वसाधारण जनतेला/ग्राहकांना भासवुन सदरचे सिमेंट हे बिर्लासुपर सिमेंट कंपनीचे पुर्वी वापरण्यात आलेल्या जुन्या सिमेंटच्या गोण्यांमध्ये भरुन, जनतेची व कंपनीची फसवणुक करुन, सर्व साधारण जनतेस/ग्राहकांना विक्री साठी तयार करीत असलेचे व शासनाचे सर्व प्रकारचे महसुल बुडवीत असल्याचे आढळुन आले.

सदर कारवाईमध्ये प्रक्रियेसाठी वापरण्यात आलेले सिमेंट व साहित्य जप्त करण्यात आले आहे.

१) ०४,२०,८०० /- रु. एकुण १६०३ सिमेंटच्या मिक्सींग केलेल्या व मिक्सींग करण्यासाठी आणलेल्या भरलेल्या सिमेंट गोण्या,

२) १५,६०,००० /- रु. दोन टाटा आयशर टेम्पो,

३) ००,०१,१७९ /- रु. लोखंडी फावडे, लोखंडी मोठे नरसाळे, प्लॅस्टीक घमेली व इतर साहित्य

--------------------

१९,८१,९७९/- रु. एकुण

सदर गुन्हयात अटक करण्यात आलेल्या आरेपींचे नावे

(१) मालक :- अन्वर हुसेन शेख, वय ५० वर्षे, धंदा व्यापार, रा. कुमार पर्णकुटी, फलॅट नं. २६, भाजीमार्केटजवळ, लोकसेवा चौक, येरवडा, पुणे

(२) मॅनेजर :- रमाकांत राजकुमार पांडे वय ४० वर्षे, रा. चौधरी इंटरप्रायझेस गोडाऊन सातवनगर, हांडेवाडी, हडपसर, पुणे मुळगाव पुरीचरणपांडे कापुर्वा पोस्ट बैजापुर, तालुका लबुवा, जि. सुलतानपुर, उत्तरप्रदेश

(३) कामगार :- शामकुमार कल्लु कोळी, वय १९ वर्षे, रा. सदर व मुळ गाव रामगंज,ता. सुलतानपुर जि. अमेठी, उत्तरप्रदेश,

(४) कामगार:- अमरनाथ रामखिलावत कोळी वय ३४ वर्षे, रा. सदर व मुळ गाव अमेलीया कला ता. व जि. सुलतानपुर, उत्तरप्रदेश,

(४)कामगार :- शिवपुजन भोलुप्रसाद प्रजापती, वय ४२ वर्षे, रा. सदर व ग्राम व पोस्ट डिया ता. कुंडा, जि. प्रतापगढ

सदरची कारवाई ही मा. अपर पोलीस आयुक्त सो. श्री प्रदीप देशपांडे मा. पोलीस उप आयुक्त, गुन्हे, श्री पंकज डहाणे सो.,मा. सहा पोलीस आयुक्त, गुन्हे- २ श्री संजय निकम सो.,यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री ब्रम्हानंद नाईकवाडी, सहायक पोलीस निरीक्षक श्री. गणेश पवार, पोलीस उप निरीक्षक पी.डी. गायकवाड, कर्मचारी :- नरेद्र सोनवणे, राज देशमुख, रमेश भिसे, प्रदीप शेलार, भालचंद्र बोरकर, हजरत पठाण, अतुल मेंगे, तानाजी गाडे, विठठल बंडगर, किरण चोरगे, दत्ता फुलसुंदर, कांतीलाल बनसुडे, शितल शिंदे यांनी केली आहे.

